# प्रेस नोट

**महिला तक्रार निवारण समितीकरीता 'अशासकीय सदस्य' पदासाठी नियुक्ती करणेबाबत.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे कार्यालयात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' अंतर्गत महिला तक्रार समिती (ICC) गठित करण्याच्या अनुषंगाने अशासकीय सदस्याची निवड करण्यात येणार आहे. **अशासकीय सदस्य (NGO/बाह्य सदस्य)** पदासाठी सामाजिक कार्य, महिला हक्क किंवा कायद्याचे ज्ञान असलेल्या पात्र महिलांकडून/व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येणार आहे. तसेच त्याबाबत सविस्तर जाहिरात व विहित नमुन्यातील अर्ज बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावरती http://barti.maharashtra.gov.in (वेबसाईट) प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इच्छुकांनी त्वरित आपला अर्ज समक्ष कार्यालयामध्ये किंवा est.barti2014@gmail.com या ई-मेल आयडीद्वारे सादर करावा, असे आवाहन बार्टी महासंचालक श्री. सुनील वारे यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था )

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.

Email Id: dg@barti.in Website: http//barti.maharashtra.gov.in


## महिला तक्रार निवारण समितीकरीता 'अशासकीय सदस्य' या पदासाठी जाहिरात

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' अंतर्गत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या कार्यालयाकरीता अंतर्गत महिला तक्रार समिती (ICC) गठित करण्याच्या अनुषंगाने अशासकीय सदस्याची निवड करण्यात येणार आहे. **अशासकीय सदस्य (NGO/बाह्य सदस्य)** पदासाठी सामाजिक कार्य, महिला हक्क किंवा कायद्याचे ज्ञान असलेल्या पात्र महिलांकडून/व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पात्रता व अनुभव:**

- एनजीओ (NGO) किंवा संघटना: महिलांच्या हक्कांसाठी प्रतिबद्ध असलेल्या एनजीओ किंवा संघटनेशी संबंधित व्यक्ती
- कायदेशीर ज्ञान: कामगार, नागरी किंवा फौजदारी कायद्याचा (Labor, Civil, Criminal law) अनुभव असलेला वकील
- सामाजिक कार्य: महिला सक्षमीकरण किंवा लैंगिक छळवणुकीच्या समस्यांवर काम करण्याचा किमान 5 वर्षांचा अनुभव
- तटस्थता: संस्थेशी कोणताही थेट संबंध नसलेली आणि निःपक्षपाती व्यक्ती

**मुख्य जबाबदाऱ्या:** समितीच्या बैठकांना उपस्थित राहणे, तक्रारींची निःपक्षपातीपणे चौकशी करणे आणि अहवाल सादर करणे

**आवश्यक कागदपत्रे** : विहित नमुन्यातील अर्ज, बायोडाटा (शैक्षणिक व कामाचा अनुभव), फोटो, ओळखीचा पुरावा.

- बार्टीच्या संकेतस्थळावर विहित नमुन्यातील अर्ज https://www.barti.in/Internal Complaint Committee - ICC या लिंकवर उपलब्ध आहे.
- **अर्जाचा अंतिम दिनांक २७/०२/२०२६**
- अर्ज सादर करावयाचा पत्ता :- महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे, २८ क्वीन्स गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे ४११ ००१ दुरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३०

  E-mail ID : est.barti2014@gmail.com

**टिप : दि. २७/०२/२०२६ तारखेनंतर प्राप्त अर्ज व अपूर्ण भरलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.**

**महासंचालक**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

**कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत, शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थांमधील अंतर्गत तक्रार समितीवर (ICC) अशासकीय सदस्य (NGO/(महिला समिती) पदासाठी अर्ज**

प्रति,
मा.महासंचालक,
डॉ.बाबासाहेब बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.

**विषय :- महिला समिती अशासकीय सदस्य पदासाठी अर्ज.**

१. अर्जदाराचे पूर्ण नाव (श्री./श्रीमती): ____________________

२. पूर्ण पत्ता (कायमचा व सध्याचा): ____________________

३. भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.): ____________________

४. ईमेल आयडी : ____________________

५. जन्म तारीख व वय : ____________________

६. शैक्षणिक पात्रता: ____________________

७. अनुभव (महिला कल्याण/कायदेविषयक/सामाजिक कार्य-किमान ५ वर्ष) :
*(अनुभवाचे प्रमाणपत्र जोडावे)* ____________________

८. सद्य: स्थितीत कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव (असल्यास): ____________________

**सोबत जोडलेली कागदपत्रे :**

१) वय व रहिवासी पुरावा (आधार कार्ड/पॅन कार्ड)
२) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र
३) अनुभवाचे प्रमाणपत्र (शैक्षणिक/सामाजिक कार्य)
४) बायोडाटा (Resume)

**<u>घोषणापत्र</u>**

मी घोषित करते / करतो की, वरील सर्व माहिती खरी असून, माझेवर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही.

**ठिकाण :**
**दिनांक :**

**अर्जदाराची सही**